# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

☎ २५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी /२०१९/ ८१७१ दिनांक : 11 DEC 2019

प्रति

संचालक / प्राचार्य

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायीक

अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसाईक अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या पडताळणीबाबत....

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/प्र.या पडताळणी/२०१९/७१५ दिनांक ०९/०९/२०१९.

२. या कार्यालयचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/गुणवत्तायादी/२०१९/४७०० दिनांक १६/११/२०१९.

३. मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/परिपत्रक/८२७ दिनांक ०७/११/२०१०

४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रीया २०१९-२०/५०१२ दिनांक ०४/१२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्र क्र ३ व्दारे प्राप्त निर्देशानुसार या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र ४ व्दारे आपणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्याच्या गुणवत्तायादी **Safalta** या वेब पोर्टलवर तपासणी करण्यासाठी उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तपासणीसाठी जाताना तपासणी केंद्रावर या कार्यालयाने पडताळणी केलेली गुणवत्तायादी व तपासणी पत्राची छायाप्रत जमा करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या व सदर ची कार्यवाही दिनांक १२/१२/२०१९ पर्यत पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि अनेक संस्थांनी तपासणी केंद्राकडे संपर्क साधाला नसल्याचे निर्देशनास आलेले आहे. त्याअनुषंगाने सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की त्यांनी गुणवत्तायादी ऑन लाईन पडताळणीचे कार्यवाही पूर्ण होण्यासाठी दिनांक १२/१२/२०१९ पर्यत तपासणी केंद्राकडे या कार्यालयाने पडताळणी केलेली गुणवत्तायादी व पडताळणी पत्राची छायाप्रत जमा करावी. ज्या संस्थां विहीत कालावधीत गुणवत्तायादी पडताळणीचे अनुषंगाने कार्यवाही करुन घेणार नाहीत अशा संस्थांच्या विद्यार्थ्याच्या प्रवेशाच्या मान्यतेचे काम **Safalta** या वेब पोर्टलव्दारे केलेजाणार नाही व सदर प्रवेशास मान्यता न मिळाल्यास याची सर्वस्वी जबाबादारी हि संबधीत संस्थेच्या प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी.

**उपरोक्त संदर्भ पत्र क्र ४ मध्ये दर्शविले उपकेंद्रामध्ये अशतः बदल करण्यात आलेला असून, तो सोबत जोडलेला आहे. त्यानुसार सर्व संस्थांनी संबधीत केंद्रामध्ये जावून तपासणी करुन घ्यावी.**

ज्या संस्थांनी या कार्यालयाकडून गुणवत्तायाद्या पडताळणी करुन घेतलेल्या आहेत व सदर पडताळणी मध्ये एसईबीसी विद्यार्थ्याच्या जात पडताळणीच्या त्रुटी नजर चुकीने दर्शविलेल्या आहेत अशा संस्थांनी तात्काळ या कार्यालयास संपर्क साधून सदर त्रुटीचे पत्र बदलून घ्यावे.

**ज्या संस्थांची पूर्वी वितरीत केलेल्या ई बी सी चे उपयोगिता प्रमाणपत्रा सादर न केल्याने, शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची गुणवत्तायाद्या प्रलंबीत आहेत, अशा सर्व संस्थांनी प्रलंबीत ई बी सी चे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ सादर करुन गुणवत्तायादी या कार्यालयाकडून विहीत मुदतीत पडताळणी करुन घ्यावी.**

**प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रवेशमान्यतेचे काम प्रलंबीत राहील्यास व सदर विद्यार्थ्याचे प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबादारी संस्थाप्रमुखांची राहील याची आपण नोंद घ्यावी.**

**सोबत — प्रवेश तपासणी उपकेद्रांचा सुधारित तपशिल**

प्र. सहसंचालक

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☎(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ : www.ropune.org.in


शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही 'सफलता पोर्टल'द्वारे करण्याबाबत या कार्यालयांतर्गत सदर कार्यवाही करण्याकरीता या कार्यालयाच्या अधिनस्त स्थापन करण्यात आलेल्या उपकेंद्रांमध्ये खालील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे.

| अनुक्रमांक | तपासणी केंद्राचे नाव | नेमुण दिलेला जिल्हा | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे | पुणे | औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र अभ्यासक्रम |
| | | सोलापुर | सर्व अभ्यासक्रम |
| २ | अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे | पुणे | सर्व अभ्यासक्रम (औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र अभ्यासक्रम वगळुन) |
| ३ | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,सांगली | सांगली, कोल्हापुर | सर्व अभ्यासक्रम |
| ४ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड | सातारा | सर्व अभ्यासक्रम (औषधनिर्माणशास्त्र वगळुन) |
| ५ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी | पुणे (जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील संस्था) | सर्व अभ्यासक्रम |
| ६ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड | सातारा | औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम |

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६
(020)25656234, FAX : (020)25656234
ईमेल : ropune@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ : ww.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१९-२०/ 5012 दिनांक : 04 DEC 2019

प्रति,
संचालक/प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्था (पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम)

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची 'सफलता पोर्टल' द्वारे कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबत....

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रवेश प्रक्रिया २०१९-२०/४७९३ दिनांक २२/११/२०१९
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९/परिपत्रक/८२७ दिनांक ०७/११/२०१९
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक प्रनिप्रा/प्रक्र६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/९८७ दिनांक ३१/१०/२०१९

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक १ द्वारे मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही **'सफलता पोर्टल'** द्वारे करण्याबाबत सुचित केले आहे.. सबब या कार्यालयांतर्गत सदर कार्यवाही करण्याकरीता या कार्यालयाच्या अधिनस्त खालील तक्त्यानुसार उपकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

| अनुक्रमांक | तपासणी केंद्राचे नाव | नेमुण दिलेला जिल्हा | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे | पुणे व सोलापुर | सर्व अभ्यासक्रम (औषधनिर्माणशास्त्र वगळुन) |
| २ | वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,सांगली | सांगली, कोल्हापुर | सर्व अभ्यासक्रम |
| ३ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड | सातारा | सर्व अभ्यासक्रम (औषधनिर्माणशास्त्र वगळुन) |
| ४ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी | पुणे (जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील संस्था) | सर्व अभ्यासक्रम |
| ५ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,कराड | सातारा, सांगली, कोल्हापुर | औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम |
| ६ | भारती विद्यापीठाचे पुना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे | पुणे व सोलापुर | औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम |

या अनुषंगाने पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांच्या (पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम) संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही **'सफलता पोर्टल'** द्वारे करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी / पडताळणीबाबत व प्रवेश मंजुरीबाबतची कार्यवाही ऑफलाईन पदधतीने या कार्यालयाकडुन करण्यात आली आहे. तसेच संस्थांना त्याबाबतचे पत्र देण्यात आले आहे. **सर्व संस्थांनी सदर गुणवत्ता यादी तपासणीबाबतचे पत्राची प्रत व प्रमाणित गुणवत्ता यादीची प्रत तसेच त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी ( विद्यार्थ्याचे नांव, ॲप्लिकेशन आयडी, प्रवेशित अभ्यासक्रम/शाखा/वर्ष, त्रुटीचे विवरण व शेरा )** उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे त्यांना नेमुन दिलेल्या केंद्राकडे दिनांक १२/१२/२०१९ पर्यत खास दुतामार्फत हस्तदेय जमा करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग,मुंबई ४०० ००१ ( लक्षवेध : कार्यासन क्रमांक २ अ ) यांना सविनय सादर